स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेचे चिकित्सक अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पीएच.डी.
(राज्यशास्त्र) या पदवी करिता सादर करण्यात आलेला
संशोधन आराखडा

-: सशोधक :-
चोपडे विनायक भगवानराव
एम.ए.नेट (राज्यशास्त्र)

-: मार्गदर्शक :-
प्रा.डॉ.साहेब गुलाबराव राठोड
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभागप्रमूख,
स्व.नितीन महाविद्यालय, पाथरी जि.परभणी

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेचे चिकित्सक अध्ययन

प्रस्तावना :-

जगातील अनेक देशात मानवाने निर्माण केलेल्या सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक विषमतेमुळे मानवा-मानवात श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव केला जात होता ज्यांच्याकडे संपत्ती आहे, असे लोक गरीब लोकांची पिळवणूक करीत होते. विषमतावादी समाज व्यवस्थेमुळे श्रीमंत व्यक्ती ही अधिक श्रीमंत होत गेली व गरीब हा दयनीय अवस्थेमध्ये जीवन व्यथित करु लागला.

स्त्री ही सर्व जगाची जननी आहे तिच्याशिवाय कोणत्याही क्षेत्राची प्रगती करणे अशक्य आहे. परंतु जगातील पुरुषप्रधान संस्कृतिच्या माऱ्याखाली स्त्री ही अत्यंत खालच्या पातळीचे जीवन जगत होती. ज्या स्त्रीशिवाय समाज निर्माण करणे अशक्य आहे त्या स्त्रीला मान, सन्मान नव्हता तिचे जीवन हे उदासिनतेचे व पुरुषाची गुलाम बनून जगने हेच होते. घरातील सर्व कामात तिचा हातभार असे परंतु तिला शिक्षण नाही, स्वातंत्र नाही म्हणून स्वातंत्र्याच्या आभावी तिचे जीवन एक नरकयातना झाले होते.

भारत हा अनेक जातीचा समुह आहे. भारत देशात विविध जाती, उपजाती आहेत ज्यांच्यात रोटी-बेटी व्यव्हारावर बंदी घालण्यात आली होती ज्या जाती राजकीय आर्थिक व सांस्कृतीक बाबतीत संपन्न समजल्या जात त्या श्रेष्ठ व ज्या जाती गरीब होत्या त्या जाती भारतात कनिष्ठ होत्या ज्यांच्याकडे उत्पन्नाचे साधणे नव्हती आणि उत्पन्नाची साधने नसल्यामुळे या जातींना वरिष्ठ जातीवर अवलंबुन राहावे लागे. श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या जाती कनिष्ठ जातीवर अन्याय, अत्याचार करत असत यातून श्रेष्ठ जाती अधिक श्रीमंत होत गेल्या व कनिष्ठ जाती अधिक गरीब होत गेल्या त्यामुळे सामाजिक विषमता निर्माण झाली.

१७ व्या व १८ व्या शतकात लोकशाहीचा प्रसार व प्रचार झाला, लोकशाही ची उभारणी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यावर आधारित असल्याने त्यांना समाजातील विषमता मान्य नव्हती. ज्यावेळी जगता स्वातंत्र्य, समजा व बंधुत्वाची संकल्पना बळकटी धरु लागली त्याच वेळेस भारतामध्ये देखील पुरोगामी विचारवंत उदयास आली, ज्यांनी या विषमतावादी समाजास समतावादी बनवण्याचा प्रयत्न केला; ज्यामध्ये प्रकर्षाने नाव घ्यावे ते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे जे कार्य केले ते सामाजिक न्याय मिळावा, श्रेष्ठ कनिष्ठत्वाची दरी कमी व्हावी या हेतूने. डॉ.बाबासाहेब

आंबेडकरांनी आपल्या संपुर्ण आयुष्यात लढा दिला आणि हा लढा देत असतांना त्यांनी जे काही लिखाण केले ते लिखाण सामाजिक न्यायावर आधारीत आहे; ज्यातून सर्व जाती, धर्म, सुख, समाधानाने राहून भारताच्या विकासात हातभार लावतील असे डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे लिखाण कार्ये आहे व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले, परंतू आधुनिक काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना याचा विसर पडलेला आहे. या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेचे चिकित्सक अध्ययन यावर संशोधन करण्यात येणार आहे.

अभ्यास विषयाचे महत्व :-

भारतीय समाजात विविध जाती, धर्म, वेशभूषा, भाषा प्रांताचे लोक राहतात. या समुहामध्ये राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवण्याची गरज आहे, म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतलेल्या लोकशाही मूल्याची गरज आहे, आज भारतीय समाजात प्रगती करणारा एक समूह तर जास्तीत जास्त गरीब होत जाणारा दुसरा समूह आहे. जो की भारताच्या विकासात प्रगती करणारा एक समूह तर जास्तीत जास्त गरीब होत जाणारा दुसरा समुह आहे, जो की भारताच्या विकासात त्यांचा ही हातभार लागणे गरजेचे आहे. गरीब आणि श्रीमंताची दरी ही गरीबाला योग्य ती संधी न मिळाल्याने होते. त्यातून गरीब समुहात श्रीमंताच्या बाबतीत तिरस्काराची भावना तयार होते. यातून मार्ग काढण्यासाठी या देशातील शेवटच्या घटकाला मुख्य प्रवाहात आणून त्यांना मान सन्मानचे जीवन जगण्यासाठी हातभार लावणे गरजेचे आहे आणि हे सर्व साध्य करण्याची शक्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची गरज आहे. भारत हा विकसनशील देश आहे. प्रत्येक क्षेत्रात भारत प्रगती करताना दिसत आहे; परंतु आजही भारतीय स्त्री ही समाजात दुय्यम समजली जाते. तिला पुरुषाच्या बरोबरीने हक्क अधिकार दिले जात नाहीत. स्त्रीयावर आजही हुंडा बळी, अन्याय, अत्याचार होत आहे. स्त्रीयांच्या या सर्व समस्यावर उपाययोजना करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या आयुष्यामध्ये लढा दिला जो लढा स्त्रीयांना योग्य तो सामाजिक न्याय मिळवून देणारा आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाची संकल्पना महत्वाची आहे.

संशोधनाची उदिष्ट्ये :-

०१. सामाजिक न्याय या संकल्पनेबद्दल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भुमिकेचा शोध घेणे.

०२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार कितपत स्वीकारली याचा शोध घेणे.

०३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे भारतीय समाजात परिवर्तन झाले का ? या स्थितीचे अध्ययन करणे.

०४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेची गरज व उपयोगितेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

०१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय व संकल्पनेमुळे विचार व आचरणात परिवर्तन झाले आहे.

०२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेमुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थितीत परिवर्तन झाले आहे.

०३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेमुळे राष्ट्रीय एकात्मतेला चालना मिळाली आहे.

०४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्याय संबंधीचे विचार इतर मागासवर्गीयांनी समजुन घेतले नाही.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येईल. माहिती संकलना करिता प्राथमिक तथ्ये व दुय्यम तथ्याचा उपयोग करण्यात येईल.

प्राथमिक तथ्ये :-

प्राथमिक साधनात काही मान्यवर विचारकांसी मौखिक संवाद साधण्यात येईल.

दुय्यम तथ्ये :-

दुय्यम साधनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विविध ग्रंथ, शासकीय स्तरावरती निघणारे पुस्तके, शासकीय अहवाल, मासिके, विविध विचारवंतांनी लिहीलेली पुस्तके, वर्तमानपत्रे याचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा आवाका जागतिक स्थरावरचा आहे या अनुषंगाने संशोधन विषयानुसार माहिती संकलीत करण्यात येईल ही संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरण नियोजन :-

०१. प्रस्तावना.

आजही समाजात विविध स्थरामध्ये असमानता दिसून येते ही असमानता संपत्ती, साक्षरता व्यक्ती मध्ये जाती, धर्माच्या नावावरुन भेदभाव केला जातो हा भेदभाव व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासात आडसर निर्माण करतो त्यामुळे समाजात सामाजिक असंतुलन निर्माण होते. जो दबलेला, शोषित वर्ग आहे त्या वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना उत्पन्न होते यातून राष्ट्र विघातक कृति घडु शकतात. या देशातील उच्च निच, भेदभाव विरहित समाज घडविण्यासाठी या देशातील प्रत्येक नागरीकाला त्याचा विकास करण्याची संधी मिळायला हवी. स्त्री ही समाजाचे अविभाज्य अंग आहे; परंतू स्त्रीला तिच्या कमकुवतपणाची जाणीव आपल्या देशात करुन दिली जाते सध्यस्थितीमध्ये स्त्रीयांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते ते सामाजिक विकासासाठी घातक आहे. चांगला समाज घडविण्यासाठी त्या देशाला सर्व नागरीकांचा सामाजिक, राजकीय, सास्कृतिक, आर्थिक व वैज्ञानिक विकास होणे गरजेचे आहे. सामाजिक न्यायाचे अंतिम लक्ष्य हे समाजातील सर्वांगीण विकास करणे हे आहे, म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाची संकल्पना महत्वाची आहे.

०२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र लिखाण.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण, ज्यात बालपणिचे अनुभव, आईचे निधन, रामजी सकपाळाने दिलेली नैतिकतेचे धडे, बालपणात बसलेले जातीव्यवस्थेचे चटके व अनुभव, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेले माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण ज्यामध्ये लंडन व अमेरिकेतील शिक्षण, उच्च शिक्षणासाठी डॉ.आंबेडकरांना दिलेले आर्थिक पाठबळ याचा समावेश करण्यात येईल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण पुर्ण झाल्यास त्यांनी सामाजिक चळवळीत सहभाग घेतला

त्यांनी केलेले सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, चवदार तळ्याचे सत्याग्रह इत्यादी बाबीचा उल्लेख करण्यात येईल डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेली वृत्तपत्रे, राजकारणातील सहभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील कार्ये, महापरिनिर्वान व समारोप इत्यादी बाबीचा समावेश करण्यात येईल.

०३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संबधीचा भुमिका.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते धर्म, जात, लिंग, वंश व प्रदेश भेदभाव न मानता शोषित वर्गाला केवळ न्यायच नव्हे तर त्यांचे अधिकार व हित सुरक्षित असायला हवेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्याय संकल्पनेत सामाजिक बहिष्काराला विरोध करण्यात आलेला आहे. समाजात वावरत असतांना व्यक्तीकडून समाजातील चालीरिती परंपराविरोधात वर्तन केल्यानंतर त्या व्यक्तीला समाजबाह्य केले जाते. भारतात बलुतेदार अलुतेदाराची पध्दत होती म्हणजेच विशिष्ठ जातीने ठरवून दिलेली कामे करावी हा परंपरागत घालून दिलेला नियम होता या जातीआधारीत कामामुळे जे कनिष्ठ कामे आहेत ज्यामधून ज्यांचा आर्थिक विकास होत नव्हता यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला.

भारतात पुरुषप्रधान संस्कृती होती, महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क अधिकार नव्हते, महिलाचे शोषण केले जाई ज्यात हुंडाबळी, अपहरण, बलात्कार, छेडछाछ या समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे समाजात एक बाजु कमकुवत होती या कारणाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुरुषसत्तेला विरोध केला आहे.

जमीन आणि संपत्तीचे समान वाटप होऊन जमीनीचे सार्वत्रिकरण करण्यात यावे यातून शेतीमालाला योग्य तो भाव मिळून सर्वांची प्रगती होईल तसेच स्त्रीयांना वडील व पतीच्या संपत्तीत वाटा असावा कारण तिला दोघेही नसतांना संपत्ती असणे महत्वाचे आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटते.

अशा प्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची संकल्पना हि विस्तृत स्वरुपात मांडली आहे.

०४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा समाजवाद

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजवादाचा पुरस्कार केला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना रशिया व चीनचा समाजवाद मान्य नव्हता. डॉ.आंबेडकरांच्या मते, या देशातील समाजवादी व्यवस्था राजकीय तसेच आर्थिक क्षेत्रात लोकशाहीचा स्वीकार करुन आणि उद्योगधंद्यावर सरकारची मालकी प्रस्थापित करुन समाजवादी व्यवस्था प्रस्थपित होऊ शकते यातून सर्व घटकांचा विकास होऊन भारतीय समजा प्रगतशील होईल तसेच या देशात संपत्तीचे विकेंद्रीकरण झाल्याने कोणताही वर्ग दुर्बल शोषित राहणार नाही यातून भारतीय समाज एक संघ व एकात्म राहिल अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही समाजवाद या देशामध्ये रुजविण्यासाठी प्रयत्न केले.

०५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेची वस्तुस्थिती व गरज.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संबंध भारतीय समाजाचा विचार करुन आपले विचार मांडले व विचाराप्रमाणे कार्य केले परंतु भारतामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा स्वीकार केलेला नाही काही बोटावर मोजता येतील एवढ्याच समुदायाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा स्वीकार केला. स्त्रीयासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिल मांडले ते लोकसभेत मंजुर करुन घेण्यासाठी मोठी ताकद पणाला लावली ज्यात स्त्रीयांच्या सर्वांगीण समस्यांचा ऊहापोह केला होता व ते बिल मंजुर झाले नाही म्हणून डॉ.आंबेडकरांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला परंतु आजही स्त्रीयांनी डॉ.आंबेडकरांना समजुन घेतले नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इतर मागासवर्गीय, अदिवासी, अनुसूचित जाती व कामगार या सर्वांसाठी आयुष्यभर लढा दिला व त्यांना शोषण मुक्त करण्याचा संकल्प केला पण या सर्व समुद्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या सामाजिक न्याय संकल्पनेचा स्विकार केला नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या सामाजिक न्याय संकल्पनेची आज गरज आहे आजही समाजात शोषित दुर्बल घटक आहे. या दुर्बल घटकाचे शोषण होत आहे त्यांना या शोषणातून मुक्त करण्यासाठी व त्या सर्व शोषित समुदायाला समाजाच्या मुख्य प्रवाहात घेण्याची गरज आहे आणि हे सामर्थ्य फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय संकल्पनेच्या माध्यमातून साध्य होईल.

०६.   सारांश व निष्कर्ष.

प्रकरण नियोजनानुसार सारांश व शिफारशी सुचविण्यात येतील.

संदर्भ सुची :-

०१.   धनंजय कीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, २०१६.

०२.   सि.एम.खंडेला, मानवधिकार, एवं सामाजिक न्याय, पॉइन्टर प्रकाशान, २००८.

०३.   डॉ.डी.आर.जाटव, सामाजिक न्याय का सिंध्दांत, समता साहित्य सदन, २०१५.

०४.   कांता मीना, हेमराज मीना, गांधी नेहरु आंबेडकर, सामाजिक न्याय एवं राजनीती, आदी प्रकाशन, २०११.

०५.   संन्त ज.गो, असा मी जगलो, सुगाव प्रकाशन पुणे, एप्रिल, १९७६.

०६.   गायकवाड प्रदिप, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, क्षितीज पब्लीकेशन, नागपुर, १५ ऑगस्ट २०११.

०७.   डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संविधान सभेतील भाषणे आणि चर्चा, युगसाक्षी प्रकाशान, नागपुर.

०८.   आनंद तेलतुंबडे, सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण, लोक वाङमय ग्रह.

०९.   महेश अन्नापुरे, सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजना व सवलती, साकेत प्रकशान.

१०.   प्रा.पी.के.कुलकर्णी, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड प्रकाशन.

११.   डॉ.रावसाहेब कसबे, आंबेडकर आणि मार्क्स, सुगाव प्रकाशन.

१२.   भास्कर लक्ष्मण भोळे, बाबा भांड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, साकेत प्रकाशन औरंगाबाद.

१३.   शंकरराव खरात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे, ठोकळ प्रकाशन नागपुर.

१४.   धम्मचारी विमलकिर्ती, डॉ.आंबेडकर आणि बौद्धधम्म, बुद्ध एज्युकेशनल फाऊंडेशन तैवान.

१५.   मा.फ.गांजरे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाषणे, खंड -६, अशोक प्रकाशन नागपुर.

१६.   रावसाहेब कसबे, आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगाव प्रकाशन नागपुर.

१७. सरोज कांबळे, प्रतिमा परदेशी, मनुस्मृती, स्त्रीया आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन धुळे - २००४.

१८. प्रा.डॉ.अशोक नाईकवाडे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, विद्या भारती प्रकाशन, २०१२.

१९. भारत वाघमारे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बील, प्रबुद्ध भारत प्रकाशन नागपुर, २४ ऑक्टोंबर २०१२.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.साहेब गुलाबराव राठोड
सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभागप्रमूख)
स्व.नितीन महाविद्यालय, पाथरी जि.परभणी

सशोधक
चोपडे विनायक भगवानराव
एम.ए.नेट (राज्यशास्त्र)